दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २१ मार्च २०२५ | अंक १०० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

सुरवात करायची असेल तर आजपासूनच करा, उद्यापासून करू असं म्हटल तर तो उद्या कधीच येत नाही.




# सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीतच न्यायदंडाधिका-यांच्या अहवालात पोलिसांवर ठपका

**मुख्यमंत्र्यांनी काय घोषणा केलेली? या प्रकरणात ज्या काही शंका उपस्थित झाल्या आहेत, त्याचं निरसन झालं पाहिजे म्हणून या सगळ्या प्रकरणाची न्यायलयीन चौकशी होईल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती.**


परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू मरहाणीत झाला आहे. न्यायदंडाधिका-यांच्या अहवालात पोलिसांवर हा ठपका ठेवण्यात आला आहे. परभणीच्या नवामोंढ पोलीस ठाण्यात सोमनाथ सूर्यवंशीना मारहाण करण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. गोपनीय अहवाल राज्य मानवाधिकार आयोगासमोर सादर करण्यात आला. आयोगाने संबंधित सर्व पोलिसांना नोटीसा बजावून उत्तर मागितलं आहे. ङ्गपरभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूला पोलीस जबाबदार आहेत. त्यांना परभणी जिल्ह्यातील नवामोंढ पोलीस ठाण्यात मारहाण करण्यात आलीङ्घ असा निष्कर्ष न्यायदंडाधिका-यांनी त्यांच्या चौकशीतून काढला आहे. सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला होता. हा ४५१ पानांचा गोपनीय अहवाल राज्य मानवाधिकार आयोगासमोर सादर करण्यात आला आहे.




परभणीत संविधान अवमाननेच्या घटनेनंतर आंदोलन झालं होतं. या आंदोलनावेळी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला होता. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूला जबाबदार असणा-या पोलिसांवर कारवाई करावी यासाठी आंबेडकरी चळवळीतील अनुयायांनी जानेवारी महिन्यात परभणी ते मुंबई असा लॉन्ग मार्च काढला होता. न्यायालयीन कोठडीमध्ये असताना सोमनाथ सूर्यवंशीना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना रुग्णालयामध्ये नेत असतानाच त्यांचा मृत्यू झाल्याचा दावा पोलिसांनी केला होता. एका माथेफिरूने १० डिसेंबरला संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केली होती, आणि त्याविरोधात ११ तारखेला परभणीत आंदोलन करण्यात आलं होतं. तीन पोलिसांच निलंबन न्यायालयीन कोठडीत असताना सोमनाथ सूर्यवंशी यांना बेदम मारहाण करण्यात आली आणि त्यात त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबियांनी केला होता. दबाव आल्यानंतर दोन महिन्यांनी तीन पोलिसांचे निलंबन करण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक कर्तिकेश्वर तूरनर, पोलीस कर्मचारी सतीश दैठणकर, मोहित पठाण, राजेश जठाल यांचे निलंबन करण्यात आलं होतं. पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांना यापूर्वी निलंबित केलं होतं.

# मस्साजोगमधील आवादा कंपनीच्या गोदामातून सव्वाअकरा लाखाच्या कॉपरच्या केबलची चोरी

केज : तालुक्यातील मस्साजोग शिवारातील अवादा एनर्जी कंपनीच्या गोदामातून ११ लाख २६ हजार रुपयाच्या कॉपरच्या केबलची चोरी झाली आसून सहाय्यक स्टोअर मॅनेजर आशुतोष जयराम सिंग यांच्या फिर्यादी वरून मंगळवारी अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.केज तालुक्यातील पवनचक्क्या उभारणीचे काम करणाऱ्या अवादा ऍनर्जी कंपनीच्या मस्साजोग शिवारातील गोदामतून



सोमवारी ( दि. १० ) च्या रात्री साडे सहा ते मध्यरात्री १२ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यानी ११ लाख २६ हजार रुपये किमतीचे कॉपरचे केबल चोरून नेल्याची घटना घडली आसून अवादा ऍनर्जी कंपनीचे सहाय्यक स्टोअर मॅनेजर आशुतोश जयराम सिंग यांच्या फिर्यादीवरून मंगळवारी ( दि. १८ ) रात्री ११ वाजता अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आसून पुढील तपास पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राकेश बनसोडे हे करीत आहेत

# सरपंच देशमुख खुन खटला बीड न्यायालयातच चालणार! सीआयडीचा अर्ज न्यायालयाकडून मंजूर



बीड : जिल्ह्याच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेनं राज्यभरात खळबळ उडाली. वातावरण चांगलंच तापलं. दरम्यान हे प्रकरण सीआयडीकडे सोपवण्यात आलं आहे, तसेच एसआयटी देखील गठीत करण्यात आली आहे. दरम्यान या प्रकरणात सीआयडीनं आरोपपत्र देखील दाखल केलं असून, न्यायालयीन सुनावणीला सुरुवात झाली आहे. या प्रकरणात आता मोठी अपडेट समोर आली आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा खटला आता बीड जिल्हा सत्र न्यायालयात चालवला जाणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने देशमुख हत्या प्रकरणाचा खटला केज न्यायालयाऐवजी बीड न्यायालयात चालवला जावा असा विनंती अर्ज करण्यात आला होता, या विनंती अजा ‍साठी काल बीडच्या न्यायालयात दोन्ही पक्षाचे वकील हजर होते. काल युक्तिवाद झाल्यानंतर आज या प्रकरणात न्यायालयानं निकाल दिला आहे. या निकालानुसार इथून पुढ ‍ सरपंच देशमुख हत्या प्रकरणाचा खटला बीड न्यायालयात चालवला जाणार आहे.

# युसूफवडगाव पोलीस ठाण्याच्या दारात आईने घेतले रॉकेल ओतून

-केज/प्रतिनिधी :-एक महिन्यापूर्वी युसूफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मुलगी गायब झाली. या प्रकरणी गायब झालेल्या मुलीची आई युसूफवडगाव पोलीस ठाण्यात चकरा मारत आहे. मात्र येथील पोलीस स्टेशनचा कारभारी जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्यामुळे आज त्या मुलीच्या आईने अंगावर रॉकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. वेळीच पोलीसांनी हस्तक्षेप केल्याने पुढील अनर्थ टळला गेला. त्यामुळे पोलीस अधिक्षकांनी या गंभीर बाबीची नोंद घेऊन महिना उलटून गेला तरी युसूफवगाव पोलीस स्टेशनचे कर्मचारी काय काम करतात याची माहिती घ्यावी आणि सदरील मुलीचा शोध घेऊन योग्य ती कारवाई करण्याची मागणी मुलीच्या आईने केली आहे.बीड जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी



पदभार घेतल्यापासून पोलीस यंत्रणा चांगली झाल्याचा गवगवा केला जात आहे. मात्र आजही जिल्ह्यातील पोलीस ठाण्याचे प्रमुख चांगला कारभार करत असल्याचे दाखवून देत आहेत. मात्र खरा कारभार आणि पोलीस अधिकारी, कर्मचा-यांची ड्यूटी करण्याची पद्धत वेगळे सांगत आहे. केज तालुक्यातील युसूफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एक मुलगी गायब झाली. सदरील या प्रकरणी मुलीची आई पोलीस स्टेशनाला जाऊन रितसर तक्रार केली होती. मात्र वेळ काढूपणा भूमिका घेत येथील पोलीस मुलीचा शोध लावण्याऐवजी दुर्लक्ष करीत आहेत. एक महिना उलटून गेला तरी सदरील मुलीचा शोध लागेना. काळजीत पडलेल्या आईचा आज संयम सुटला आणि थेट युसूफवडगा पोलीस ठाण्याच्या दारात उभे राहून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र वेळीच पोलीसांनी हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला गेला. गेल्या महिनाभरापासून युसूफवडगाव पोलीस या मुलीचा शोध घेण्यास अपयशी का ठरले आहेत याचा जाब पोलीस अधिक्षकांनी विचारून घ्यावा आणि युसूफवडगाव पोलीस स्टेशनचे प्रमुख यांची मुख्यालयी बदली करून चांगला पोलीस अधिकारी नेमून गायब झालेल्या मुलीचा शोध घेऊन त्या मातेचा शोध घ्यावा अशी चर्चा होत आहे.

# केज विकास संघर्ष समितीच्या मागणीला यश

केज (प्रतिनिधी): केज शहरातील मुख्यमहामार्गावर पिसाटी नदी ते मधुबन हॉटेल या अंतरावर असलेल्या रस्ता दुभाजकामध्ये सोडलेल्या यू टर्न मधील भाग खचल्याने धोकेदायक कटाव निर्माण झाले होते. यामुळे वळण घेताना दुचाकी वाहनधारक विशेषतः महिला, मुली, विद्यार्थी व वृद्धांना अपघाताचा धोका निर्माण झालाहोता. यासाठी केज विकास संघर्ष समितीने एचपीएम कंपनी व प्रशासनाला निवेदने देऊन तात्काळ दुरुस्ती न केल्यास बुधवार दि १९ मार्च रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात बेमुदत रस्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. या मागणी व आंदोलनाची दखल घेऊन कंपनीने सोमवार पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. आहे.यामुळे समितीने आपले आंदोलन स्थगित केले आहे. संबंधित कंपनी व प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन समस्या सोडविल्याबद्दल समितीच्या वतीने हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे व




संपत वाघमारे यांनी आभार व्यक्त केले आहेत. आता केज नगरपंच्यायतने रस्ता दुभाजकामधील साफसफाई करावी अशी मागणीही समितीने केली आहे.

# पत्रकारांना शिवीगाळ, धमकी दिल्यास ५० हाजाराच्या दंडासह तीन वर्ष शिक्षा होणार

केज/प्रतिनिधीः-हायकोर्टाच्या टिकेनंतर पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे की, पत्रकारांना शिवीगाळ, धमकी तसेच असभ्य वर्तन करणाऱ्यांना मोठी किंमत मोजावी लागणार असून ५० हजाराचा दंड आणि गैरवर्तन करणाऱ्याला तीन वर्षाचा तुरुंगवास भोगावा लागणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. या संदर्भात अधिक माहिती अशी की, प्रेस कॉन्सिलने देशाचे कॅबिनेट सचिव, गृहसचिव, मुख्यमंत्री, मुख्य सचिव व राज्याच्या गृहसचिव यांना सूचना पाठविले आहे. यामध्ये पत्रकारांना धमकी देणाऱ्याला तुरुंगात पाठविण्यात येणार असून पत्रकारांना धमकावल्या प्रकरणी अटक करण्यात आलेल्यांना सहजासहजी जामीन मिळणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

पत्रकारांना अडचणी आल्यास त्यांनी त्यांच्याशी संपर्क करावा. पत्रकार यांना मदत करा व आदराने बोला नाहीतर तुम्हाला मोठी किंमत मोजावी लागेल असे मुख्यमंत्री योगी अदित्यनाथ यांनी सांगितले. गैरवर्तन करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर एफआयआर नोंदवला जाईल. नाही तर एम एस पी कारवाई केली जाईल. पत्रकार जमावाचा भाग नाहीत हीच बाब लक्षात घेऊन प्रेस कॉन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मार्कंडेय काटजु यांनी प्रत्येक राज्य सरकारांना ताकीद दिली असून पत्रकारांशी गैर वर्तन करू नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही ठिकाणी हस्तक्षेप किंवा हाणामारी करू शकत



नाही. जसा एखादा वकील आपल्या आशिलाचा हत्येचा खटला न्यायालयात लढत असतो तसा तो कोणी होत नाही अगदी तसेच पत्रकार त्यांचे काम सार्वजनिक ठिकाणी करतात पणते गर्दीचा भाग नसतात. त्यामुळे पत्रकारांना त्यांचे कामापासून रोखणे हे माध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदाआणणारे आहे. या संदर्भात प्रेस कॉन्सीलने देशाची कॅबिनेट सचिव, गृहसचिव, मुख्यमंत्री मुख्य सचिव व सर्व राज्यांच्या गृहसचिवांना सूचना पाठविल्या असून पत्रकारांसोबत पोलीस किंवा निम लष्करी दला कडून होणारा हिंसाचार खपवून घेतला जाणार नाही असे स्पष्टपणे नमूद करण्यातआले आहे. पत्रकारावर असे कोणतीही कृत्य होणार नाहीयाची काळजी सरकारने घ्यावी. पत्रकारांसोबत पोलिसांनीकेलेला हिसाचार हा प्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्याच्या केलेला हिंसाचार हा प्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन मानले जाईल. जो घटनेच्या कलम १९ मध्ये देण्यात आला आहे. घटनेच्या या कलमानुसार गैरवर्तन करणाऱ्या पोलीस किंवा अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला जाईल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## संपादकीय

## विकास बाजूला ठेवून महाराष्ट्र धगधगतोय

राज्यात गेल्या आठवडाभरापासुन औरंगजेबाच्या कबरीवरून वादंग सुरु आहे. त्याचे परिणाम व्हायचे ते नागपूरमध्ये दिसले, तेथे दंगल उसळली. ज्या पद्धतीची चिथावणीखोर विधाने गेल्या काही दिवसांपासून होत आहेत ते पाहता अशा दंगलीची भीती होतीच! दंगल पूर्वनियोजित असल्याचे आता सांगितले जात आहे. मग, औरंगजेबाच्या कबरीवरून मंत्री आणि मुख्यमंत्री जे बोलत होते ते शांततेला निमंत्रण होते असे कसे म्हणणार? महाराष्ट्र अस्वस्थ करण्याचे हे प्रयत्न विघ्नसंतोषी घटकांनी नव्हे, तर धार्मिक भावनांना हात घालणऱ्या सरकारमधील उच्चपदस्थांनी केले हे कटु वास्तव नव्हे काय? ते आपण स्वीकारणार आहोत की नाही? सर्वसामान्यांसमोर अनेक प्रश्न असताना त्यांची सोडवणूक करण्याऐवजी औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा केंद्रस्थानी येतो, याचा अर्थ सोपा आहे. खऱ्या प्रश्नांकडे लक्ष जाऊ नये आणि धार्मिक उन्मादात नागरिकांनी मग्न राहावे, हे महायुती सरकारला अपेक्षित दिसते. छत्रपती संभाजी महाराजांवरील मछावाफ चित्रपटाने गर्दी आणि उत्पन्नाचे विक्रम मोडले. अनन्वित छळ करुन, क्रौर्याचे टोक गाठून औरंगजेबाने संभाजी महाराजांची हत्या केली. हे ऐतिहासिक वास्तव मछावाफमुळे ठळकपणे नव्या पिढीसमोर आले. आपल्या भावंडांची हत्या करणारा, वडिलांना मृत्यूच्या खाईत लोटणाऱ्या क्रूरकर्मा औरंगजेबाला महाराष्ट्राने परास्त केले. त्याच्याबद्दल भारतात कोणाला आत्मियता वाटण्याचे कारण नाही; पण धर्माच्या आधारावर तो कोणाला आपला वाटत असेल, तर ते खपवून घेता येणार नाही. शेकडो वर्षे औरंगजेबाची कबर खुलताबादला आहे. हिंदवी स्वराज्याच्या छत्रपतींची हत्या करूनही त्याला स्वराज्य जिंकता आले नाही, पराभूत मनःस्थितीत तो येथेच गाडला गेला, ही महाराष्ट्राच्या विजयाची निशाणी. ती राहू नये, हे सांगण्यामागील तर्क काय? कबरीचे अथवा औरंगजेबाचे उदात्तीकरण होता कामा नये, ही अपेक्षा योग्यच; पण मऔरंगजेबाच्या कबरीचे संरक्षण करावे लागणे दुर्दैवी आहेफ असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात तेव्हा वेगळा संदेश जातो. त्याबद्दल फडणवीस अनभिज्ञ असतील, असे अजिबात नाही. आपल्या विधानातून धार्मिक तेढ निर्माण होईल, याचे भान त्यांना असायला हवे होते. मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी नितेश राणे यांची जीभ बेलगाम सुटली आहे. यातूनच होळीच्या दिवशी कोकणात धार्मिक सौहार्दाला तडा गेला. औरंगजेबाच्या कबरीवरून वातावरण तापविण्यात हेच मंत्री आघाडीवर होते. काही ज्येष्ठ मंत्र्यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला; पण त्यांच्याकडून चिथावणीखोर विधाने येतच राहिली. मी मुख्यमंत्र्यांचा लाडका असे तेच म्हणतात. मटणासाठी ममल्हारफ प्रमाणपत्र, ही भन्नाट पण तेवढीच विद्वेषी कल्पना याच राणेंची ! अशांसारख्यांमुळे महाराष्ट्राच्या वाटचालीची दिशाच बदलत चालली आहे. धर्माच्या आधारावर कोणाच्याही बाबतीत भेदभाव करणे हा घटनेने गुन्हा आहे. या विद्वान मंत्र्यांनी धार्मिक विद्वेष वाढविण्याची एकही संधी सोडलेली नाही. मढीच्या यात्रेत मुस्लिम धर्मीय व्यावसायिकांचा प्रवेश रोखण्याचे त्यांनी हिरिरीने समर्थन केले. अशा उपद्व्यापांना आळा घालण्यात राज्यातील विरोधी पक्षांना दारुण अपयश आले आहे. मुख्यमंत्र्यांची तुलना औरंगजेबाबरोबर करणे, ही विरोधी पक्षाच्या नेत्यांची झेप ! सत्ताधाऱ्यांनी त्या विधानाचा अचूक फायदा करून घेतला. इतिहासापासून धडा घेत पुन्हा जुन्या चुका होणार नाहीत, हे पाहणे महत्त्वाचे असते. मछावाफच्या प्रदर्शनानंतर भलतेच चित्र दिसले. इतिहासकालीन चुकांबद्दल ज्यांच्याकडे निर्देश होतो त्यांचे वारसदार पुढे आले. कथित इतिहाससंशोधक महाराष्ट्राला इतिहासाचे नवे धडे देऊ लागले. यातून वातावरण गढूळलेले असतानाच औरंगजेबाची कबर आठवली आणि धार्मिक विद्वेषाचे हत्यारच जणू अनेकांच्या हाती आले. हिंदू संघटनांनी नागपुरात औरंगजेबाच्या प्रतिकात्मक कबरीला पायदळी तुडवत आंदोलन केले, तणाव वाढला. त्यात धार्मिक प्रतिमेची विटंबना झाल्याची अफवा पसरली आणि जाळपोळ, दगडफेक सुरु झाली. पोलिस आणि सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरणाऱ्यांची गय होता कामा नये, त्याचवेळी नको ते मुद्दे तापवून वातावरण बिघडविणाऱ्यांचाही लगाम खेचायला पाहिजे. महाराष्ट्रात गुंतवणूक वाढत आहे, दंगलीसारख्या घटनांमुळे त्यावर परिणाम होऊ शकतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. त्यासाठी त्यांनी आधी मंत्रिमंडळातील सहकार्यांना आवरले पाहिजे. भरभक्कम बहुमताने राज्यातील जनतेने महायुतीला निवडून दिले ते महाराष्ट्र
अस्वस्थ किंवा धगधगता राहण्यासाठी नव्हे! हे ही
राज्यकर्त्यांनी लक्षात घ्यायला हवे.

# मेरा रंग दे बसंती चोला, माय रंग दे...

२३ मार्च हा दिवस भारताच्या इतिहासातील एका महत्त्वपूर्ण घटनेची आठवण करून देतो, जिथे भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांसारख्या थोर क्रांतिकारकांनी फाशीची शिक्षा स्वीकारून देशासाठी आपलं सर्वोच्च बलिदान दिलं. या दिवशी आपण त्यांच्या त्यागाला आदराने आणि कृतज्ञतेने स्मरण करतो. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांसारख्या क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा दिल्यानंतर, २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून ओळखला जातो. या शहीद झालेल्या क्रांतिकारकांनी देशासाठी आपलं सर्वोच्च बलिदान दिलं, ज्यामुळे त्यांच्या देशभक्तीने आणि त्यागामुळे नवीन पिढीला प्रेरणा मिळते. २३ मार्चला शहीद दिन म्हणून साजरा करून, आपण या थोर क्रांतिकारकांना आदराने आणि कृतज्ञतेने स्मरण करतो. भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांसारख्या क्रांतिकारकांना अटक करण्यात आली आणि त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. २३ मार्च १९३१ रोजी या तिन्ही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा देण्यात आली, ज्यामुळे २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून ओळखला जाऊ लागला. १९२८ मध्ये भारतांमधील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून ङ्गसायमन कमिशनफ नावाचं शिष्टमंडळ आले होतं. भारतात सर्वत्र या शिष्टमंडळाचा काळे झेंडे दाखवून निषेध करण्यात आला. त्यावेळी लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला होता. ङ्गसायमन परत जाफच्या घोषणांनी सारा परिसर दुमदुमून गेला. जमाव पांगवण्यासाठी पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठी आक्रमणात लाला लजपतराय जखमी झाले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. देशभक्तीने भारावलेल्या क्रांतिकारकांना हे सहन झाले नाही. क्रांतिकारकांनी लालाजींच्या मृत्यूला कारणीभूत असणाऱ्या लाहोर पोलिस ठाण्यातील इंग्रज अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरवले.



त्याप्रमाणे लालाजींच्या पहिल्या मासिक श्राद्धाच्या दिवशी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष पालटून पोलिस अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाकडे गेले. सॅण्डर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिला. भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाच वेळी गोळ्या झाडून त्याचा बळी घेतला.

भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना इंग्रजांविरुद्ध बंड करुन ब्रिटीश पोलिस अधिकारी जॉन. पी. सॉण्डर्सची हत्या केल्याप्रकरणी २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आली होती. या तिन्ही तरुण देशभक्तांच्या फाशीनंतर तमाम भारतीयांचं रक्त आणखी पेटून उठलं त्यांच्या बलिदानानंतर स्वांतत्र्यांची चळवळ अधिक प्रखर झाली.

शहीद भगतसिंग, राजगरु आणि सुखदेव यांच्या स्मर्णार्थ प्रत्येकवर्षी २३ मार्च रोजी श्रद्धांजली वाहत हा दिवस शहीद दिवस म्हणून भारतीय साजरा करतात. शहीद भगतसिंग यांनी आपल्या छोट्याशा आयुष्यात वैचारिक क्रांतिची ज्योत पेटवली. भगतसिंग यांच्या विचारणांनी आजही तरुण प्रभावीत आहेत. भगतसिंगांची लढाई केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरतीच मर्यादित नव्हती तर ती सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी होती. ब्रिटीशांच्या जोखडातून मातृभूमीला मुक्त करण्याबरोबरच समाजवादी रचनेवर आधारित समाज निर्माण करण्याचे भगतसिंग यांचे स्वप्न होते. सर्व माणसांच्या काही अत्यावश्यक गरजा आहेत. सर्वांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या अत्यावश्यक गरजा भागविण्याची सोय होणे म्हणजे समाजवाद, अशी भगतसिंगांनी व्याख्या केली होती. त्यांनी म्हटले होते की, ङ्गक्रांती म्हणजे सध्या अस्तित्वात असणारी साम्राज्यवादी, भांडवली समाजव्यवस्था संपूर्ण उलथवून टाकून तिच्या जागी समाजवादी व्यवस्था प्रस्थापित करणे.फ स्वातंत्र्य सैनिक भगत सिंह, राजगुरू व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी या सर्वांना आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जिवाची बाजी लावणारे ब्रिटीश सरकारने फाशीची शिक्षा दिली होती. त्यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस मशहीद दिवसफ म्हणून साजरा केला जातो असतो.२३ मार्च १९३१ रोजी संध्याकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी तिघांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी तिघांनी ममेरा रंग दे बसंती चोला, माय रंग दे; मेरा रंग दे बसंती चोला।फ हे गाणे गायले होते.

श्री. कदम सी. एम
( बाळनाथ विद्यालय चाकरवाडी शिक्षक )

# सिरसमार्ग उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली, उपोषणस्थळी उपचार


गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे सिंदफणा पट्ट्यातील १४० गावातील शेतक-यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनांतर्गत गेल्या सोळा दिवसांपासून उपोषण सुरू केले आहे. जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावेत, जायकवाडीच्या उजव्या कालव्यातून उपकालवा करावा, नदीजोड प्रकल्प गतीने राबवावे, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत कृषी व उद्योगांना पाणी द्यावे या मागण्यांसाठी हे उपोषण सुरू आहे. मात्र या उपोषणाची दखल जिल्हाधिकारी, तहसीलदार किंवा जलसंपदा विभागाचे कार्यकारी अधिकारी यांनी वा शासनाने घेतली नाही. त्यामुळे दोन दिवसांपासून उपोषणकर्त्यांनी जलत्याग केले आहे.




यामुळे उपोषणकर्ते देविदास चव्हाण यांची प्रकृती खालावल्याने शासकीय वैद्यकीय अधिकारी डॉ सुरज बनसोडे, डॉ बहिर यांनी उपोषणस्थळी येत देविदास चव्हाण यांना सलाईन लावले.
दिनेश गुळवे, समन्वयक लोकलढा आंदोलन.
महादेव रडे, सिरसमार्ग.
ता. गेवराई, जि. बीड.

# धनु दामू रणसिंग व विकास बनसोडे या दलित तरुणांच्या हत्येप्रकरणी तहसिलदार यांना निवेदन.

पाटोदाः प्रतिनिधी
आष्टी तालुक्यातील जामगाव येथील धनु रामू रणसिंग याची पैशाच्या व्यवहारातून व मूळचा जालना जिल्ह्यातील असलेला ट्रकचालक विकास बनसोडे याची जातीय मानसिकतेतून झालेल्या अमानवी हत्येमुळे आज पाटोदा तहसीलदार यांना लहुजी शक्ती सेना , वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभाग (शरदचंद्र पवार), रिपब्लिकन पँथर व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. राज्यामध्ये अनुसूचित जाती जमातीवरील वाढत असलेल्या अन्याय अत्याचारांमुळे समाजामध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. आष्टी तालुक्यातील जामगाव येथील धनु दामु रामसिंग या वीटभट्टी कामगाराचा व मूळचा जालना जिल्ह्यातील असलेला ट्रकचालक याचे आष्टी तालुक्यातीलच घुमरी पिंपरी येथे झालेले हत्याकांड यामुळे आंबेडकरी समाजामध्ये प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे महाराष्ट्रामधील कायदा आणि सुव्यवस्था नावापुरतीच राहिली असल्याची भावना समाजामध्ये निर्माण झाली आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी व दोन्हींही घटनेमागील इतर मुख्य आरोपी यांना लवकरात लवकर अटक करावी तसेच विकास बनसोडे व धनु रामू रणसिंग यांना शासनाने आर्थिक मदत करावी त्यांच्या कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे



,त्याचप्रमाणे दोन्हीही कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत समाविष्ट करण्यात यावे या मागणीसाठी आंबेडकरी चळवळीतील संघटना व पक्ष यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले. निवेदनावर लहुजी शक्ती सेना पाटोदा तालुकाध्यक्ष क्षिरसागर ,वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड , राहुल शिरोळे वंचित बहुजन आघाडी तालुका उपाध्यक्ष, प्रदीप उबाळे अध्यक्ष रिपब्लिकन पँथर , डॉक्टर सुनील गायकवाड, प्रकाश साठे, ज्ञानदेव लोंढे ग्रामपंचायत सदस्य खडकवाडी, परशुराम गायकवाड ग्रामपंचायत सदस्य सौताडा, रामहरी तुकाराम घुले सरपंच पुत्र ग्रामपंचायत सौताडा, नागेश पाटोळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष आदी पदाधिकाऱ्यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

# सह्याद्री देवराई वनप्रकल्प जगवण्यासाठी वनप्रेमींच्या पुढाकाराने पाण्याचे टँकर तर पुन्हा एकदा वनप्रकल्प आगीच्या भक्ष्यस्थानी ; डोकेवाडा तलावातुन कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची गरज :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- ( दि.२० ) बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि सेने पटकथा लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या पहिले जागतिक संमेलन जागतिक वृक्ष संमेलन भरलेल्या सह्याद्री देवराई वन प्रकल्पाकडे जिल्हा प्रशासन व वनविभागाच्या दुर्लक्षामुळे घरघर लागली असुन वाळवंट होण्याच्या स्थितीत असुन पाण्याअभावी झाडे वाळली आहेत. याची दखल घेत डॉ . प्रदीप शेळके आणि त्यांचे सहकारी वृक्षप्रेमींनी टँकरद्वारे झाडांसाठी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करत जागतिक वन दिनाच्या निमित्ताने स वनप्रकल्प वाचवण्यासाठी सहकार्य करावे अशी हाक दिली आहे. दुसरीकडे काल रात्री लागलेल्या आगीत पुन्हा झाडांची हानी झाली आहे. सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा यासाठी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी डोकेवाडी साठवण तलावातुन पाइपलाइन करून कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

पाण्याच्या टँकर साठी यांचे योगदान ; १ तारखेला सयाजी शिंदे पाहणी करण्यासाठी येणार :- डॉ.प्रदिप शेळके
-----




सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांची पाण्याअभावी दुरावस्था झाली असुन झाडे वाळुन करण्याच्या अवस्थेत आहेत. आठवड्यात २५ हजार लिटरचे कमीत कमी ३ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार असुन आजपासून सुरुवात केली आहे. यासाठी अनिकेत कुलकर्णी, सुप्रिया कुलकर्णी, वैभव जाधव, डॉ.अक्षय भोपळे, आनंद मुंदडा, डॉ.अभिजित थेटे, डॉ.अनुराग पांगरीकर, डॉ.सिताराम आळणे,गोपवाड,जेठाराम प्रजापती, सलीम सय्यद,सुरवसे भाऊ,काळु बेग, अँड.राज पाटील, मनोज पवार,यांनी आर्थिक योगदान दिले आहे. सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील अडचणीच्या अनुषंगाने व्हिडिओ कॉल द्वारे सयाजी शिंदे यांच्याशी बोलणे झाले असून येत्या १ तारखेला वनप्रकल्पाची पाहणी करण्यासाठी ते येणार असुन जिल्हा प्रशासन, वनविभाग व वनप्रेमी, पर्यावरण प्रेमी यांच्या सोबत विचार विनिमय करून कायमस्वरूपी तोडगा काढणार असल्याचे त्यांनी सांगितले.असे डॉ.प्रदीप शेळके यांनी सांगितले.

रात्री लागलेली आग वनरक्षकांमुळे आटोक्यात आली ; वनमजुरांची कमतरता :- वनपाल देविदास गाडेकर

काल रात्री साडे ९ च्या सुमारास सह्याद्री देवराई वनप्रकल्पातुन आगीचे लोट उठल्यानंतर लक्षात येताक्षणी वनमजूर जयराम काळे, वनरक्षक शेषेराव राऊत,वनमजुर पदमाकर मस्के यांच्या प्रसंगावधानामुळे आग लवकरच आटोक्यात आणली. २ आर वनक्षेत्रातील झाडे आगीत भस्मसात झाली आहेत. रात्री अपरात्री याठिकाणी येणा-या समाजकंटकांमुळे असे प्रकार घडत असून रात्रपाळीसाठी वनकर्मचारी यांची आवश्यकता असल्याचे वनपाल देविदास गाडेकर यांनी सांगितले.

पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठ्यासाठी निधी उपलब्ध करून कायमस्वरूपी तोडगा काढावा :- डॉ.गणेश ढवळे

सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी कायमस्वरूपी पाणी पुरवठा व्हावा अशी मागणी तत्कालीन वन विभागीय अधिकारी के.एम.गिते यांनी करत ६७ लाख रुपये निधीची मागणी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी सहमती दर्शवली होती.परंतु तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड अजित पवार यांनी पालवण गावासाठी येणा-या जलजीवन योजनेंतर्गत कामामधुन पाणीपुरवठा करता येईल त्यासाठी वेगळा निधी खर्च करण्याची आवश्यकता नसल्याचे मत नोंदवले त्यामुळे पुढे ती योजना रखडली. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र निधी देण्यात यावा ज्यामुळे कायमस्वरूपी हा प्रश्न मिटेल अशी मागणी केली आहे.

## स्वयंसहायता बचत गटांच्या जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने यांच्या हस्ते उद्घाटन



बीड दि. २० : बीड जिल्हा परिषद व पंचायत राज विभागाच्या वतीने उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानच्या वतीने दि. २० मार्च ते २४ मार्च २०२५ या कालावधीत जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या हस्ते गुरुवार दिनांक २० मार्च रोजी करण्यात आले.

जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २०२५ च्या या गुढीपाडवा महोत्सव, ईद बाजार आणि खाद्य जत्राचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत डॉ. ज्ञानोबा मोकाटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, शिक्षणाधिकारी (निरंतर) संजय पंचगल्ले यांच्या सह मान्यवरांची उपस्थिती होती.

जिल्हा परिषदेच्या प्रांगणात उभारलेल्या २५ स्टॉलला सीईओ आदित्य जीवने यांचा सामान्य वा-याने भेटी देऊन खाद्य संस्कृती खाद्य जत्रा व स्टॉलला भेट दिली.

सदर विक्री व प्रदर्शनाची दररोज वेळ सकाळी १०.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत आहे. बचतगट स्वयंसहायता समुहातील महिलांच्या प्रगतीचा, महा खरेदीचा उत्सव, महा मेजवानीचा, गुढीपाडवा महोत्सव, ईद बाजार व खाद्य जत्रा जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २०२५ मध्ये खास आकर्षण मसाले, खाद्यपदार्थ, हस्तकला, ग्रामीण कलाकुसर, ज्वेलरी तसेच शाकाहारी व मांसाहारी मेजवानी व खुप काही आयोजित करण्यात आलेले आहे. उमेद च्या जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचा लाभ घ्यावा व एकवेळ अवश्य भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांनी केले आहे.

# नाभिक सखी सन्मान पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहावे : शहराध्यक्ष अक्षय जाधव



बीड : महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड जिल्ह्याच्या वतीने नाभिक समाजातील कर्तृत्वान महिला तसेच सामाजिक, राजकीय शैक्षणिक ,आदर्श माता अशा विविध अंगाने उत्कृष्ट कार्य असणाऱ्या नाभिक समाजातील भगिनींचा नाभिक सखी सन्मान पुरस्कार सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रम चे आयोजन दिनांक २१/३/२०२५ वार शुक्रवार सकाळी ११.३० रोजी जनशिक्षण संस्था चक्रधर नगर बीड या ठिकाणी पुरस्काराच्या वितरणाचा कार्यक्रम ठेवला आहे.या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी मुख्य आकर्षण सौ अंजली धानोरकर उपजिल्हाधिकारी संभाजीनगर बीड यांची उपस्थिती असणार यांच्या शुभहस्ते या पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र नाभिक महामंडळ शहर अध्यक्ष अक्षय जाधव यांनी केले आह

# अबब... ऐकावे ते नवलच विड्याचा ग्रामसेवक झाला गुत्तेदार !

## दलित वस्ती, १५ वा वित्त आयोग, एमआरजीएसची जुने कामे दाखवून केला निधी हडप , ग्रामपंचायत सदस्य लोचना वाघमारे यांची तक्रार

केज/प्रतिनिधी:-स्वतःला गटविकास अधिकारी समजून विडा गावचा ग्रामसेवक पोटभरे यांनी मनमानी कारभार सुरू केला आहे. मासिक मिटींग, प्रोसेडींग पूर्ण न करता ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायत सदस्याला न कळविता गेल्या दोन वर्षात ग्रामसेवक महाशयांनी दलित वस्ती, ग्राम निधी, पंधरावित्त आयोग तसेच एमआरजीएसची सार्वजनिक कामे ग्रामसभेची किंवा मासिक मिटींगची कोणतीही परवानगी न घेता ग्रामसेवकाने गुत्तेदारी करून जुने कामे दाखवून हा निधी हडप केला आहे. त्यामुळे या ग्रामसेवकावर निलंबनाची कारवाई करावी आणि जे बोगस कामे दाखवून




निधी हडप केला ते पैसे शासनाने भरून घ्यावी अशी मागणी सौ.लोचना वाघमारे यांनी केली आहे. एकंदरीत या ग्रामसेवकाच्या कारभारामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या चांगल्या कारभाराला काळीमा फासण्याचे काम होत असल्याचे बोलले जात आहे. केज तालुक्यातील विडा ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामसेवक पोटभरे यांनी पदभार घेतल्यापासून ग्रामसदस्यांना मिटिंगला न बोलविणे, नोटीस न काढणे, ग्रामसभेला न बोलावणे. एवढेच नव्हे तर गावातील लोकांना निट न बोलता वेगळ्याच भाषामध्ये बोलण्याचा पराक्रम हा ग्रामसेवक करत आहे. गेल्या दोन वर्षात ग्रामपंचायत अंतर्गत जुनी कामे झालेली आहेत. त्याच कामावर ग्राम सेवक महाशयांनी दलित वस्ती, ग्रामनिधी पंधरा वित्त आयोग, एमआरजीएस व इतर आलेल्या योजनेतून निधी स्वतः गुत्तेदारी करून जुने कामे नवे दाखवून निधी हडम केला आहे. त्यामुळे ग्रामसेवक पोटभरेवर निलंबनाची कारवाई करून भ्रष्टाचार करून जे पैसे हडप केले आहेत ते पैसे ताबडतोब भरून घ्यावे आणि निलंबित करावे अशी मागणी सुलोचना वाघमारे यांनी पचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे. मात्र शासनाची नोकरी करत असताना गुत्तेदारी करणे हा गंभीर प्रकार आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या ग्रामसेवकावर कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

# देवपिंपरी तांडा शाळेत विद्यार्थ्यांच्या गीतगायनाने प्रेक्षक मंत्रमुग्ध

गेवराई : गेवराई तालुक्यातील देवपिंपरी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने उपस्थित



प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. देशभक्तीपर, बंजारा, हिंदी चित्रपटांतील गितांवर बहारदार नृत्य सादर करण्यात आले त्याप्रमाणे समुधर गितगायनाने विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे मने जिंकली. विद्यार्थ्यांचे सादरीकरण पाहतांना प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत विद्यार्थ्यांना दाद दिली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकीर धनंजय शिंदे होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण काळम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमासाठी माजी जि.प. सदस्य फुलचंद बारकर, नंदाताई गवारे, सुदामराव पवार, श्रीतीर्थराजे गवारे, बाबुराव पवार, रमेश पवार, अंकुश राठोड, शौकत शेख यांची प्रमुख उपस्थित होते. शाळेच्या इतिहासात पहिल्यांदाच वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
या कार्यक्रमाबद्दल ग्रामस्थ व उपस्थित मान्यवरांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे कौतूक केले. दरम्यान मुख्यायापक मुकुंद आहेर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, २२ पटसंख्या असणारी देवपिंपरी तांडा शाळा सर्वात लहान शाळा आहे. मागील पाच वर्षात जे स्वप्नम् पाहिलं होतं ते आज साकार झालं.

# वारकरी संतांनी सांगितलेला खरा व्यवहारिक धर्म समजून घ्यायला हवा - ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे

बीड (प्रतिनिधी) संत नामदेव, संत ज्ञानदेवांपासून संत तुकाराम महाराजांपर्यंत अठरापगड जाती धर्मातील वारकरी संतांनी सांगितलेला खरा व्यवहारिक वारकरी धर्म समजून घ्यायला हवा व समजून सांगायला हवा, धर्माची नशा व जातीची झिंग यातून समाजाला बाहेर काढण्याचे काम वारकरी धर्मच करू शकतो, संतांनी दाखवलेल्या मार्गावरून जर चाललो तर जातीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक गुंता सहज सुटू शकतो असे प्रतिपादन ह भ प समाजप्रबोधनकार संतोष महाराज डोंगरे यांनी केले. बीड पासून जवळच असलेल्या मौजे राजुरी घोडका ता. जि. बीड या ठिकाणी गणेश चतुर्थी निमित्त ह भ प संतोष महाराज डोंगरे यांचे हरिकीर्तन झाले याप्रसंगी ते बोलत होते धर्माचे पालन । करणे पाखंड खंडण हे चि आम्हां करणे काम । बीज वाढवावें नाम ध्रु.तीक्ष्ण उत्तरें । हार्ती घेउनि बाण फिरें २ नाही भीड भार । तुका म्हणे सान थोर ३ या जगद्गुरु तुकोबाराय यांच्या गाथेतील चार चरणांच्या अभंगावर निरूपण करताना ते पुढे म्हणाले धर्माचे पालन करत असताना समस्त समाजातील वासना, द्वेष, अहंकार, तिरस्कार, राग, लोभ, मत्सर, अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड या सर्व पाखंडांचे खंडन करणे होय. त्यासाठी ज्याने त्याने आपापले कर्म इमाने ईतबारे केले पाहिजे. प्रत्येकाचे कर्म हाच त्याचा धर्म असं जर मानलं तर मानवी प्रगतीला चालना मिळू शकते. त्यासाठी ज्याने त्याने आपाआपले कर्म केले पाहिजे. आज शेतात राबणारा शेतकरी आणि सीमेवर उभा असलेला शेतकरी पुत्र सैनिक आपल्या कर्मालाच धर्म मानून कार्य करतात हा आदर्श सगळ्यांनी उरात बाळगला पाहिजे. पाप मुक्ती पुण्यप्राप्ती देवप्राप्तीसाठी वारकरी संतांनी हरिनामाचा जप करणे, नामसंकीर्तन करणे हा सोपा मार्ग सांगितलेला आहे या मार्गाने गेल्यास अंधश्रद्धा आणि कुठल्याही कर्मकांडाची गरज पडणार नाही. वारकरी संतांनी व्यवस्थेविरूध बंड केले ते यासाठीच. सद्यस्थितीत बोगस देव, बोगस संत व बोगस ग्रंथ यापासून सर्वांनी दूर राहिले पाहिजे. महिलांमधील अंधश्रद्धा आणि पुरुषांमधील व्यसनाधीनता कौटुंबिक विकासातील अडथळा बनत आहे. तरुणांमधील



व्यसनाधिनता वरचेवर चिंतेचा विषय बनत आहे. व्यसन, अंधश्रद्धा आणि कर्मकांड यांपासून आपण दूर राहिलो तर आपली प्रगती कोणीच रोखु शकत नाही. आज शिक्षणाशिवाय पर्याय नाही .जो शिकेल तोच टिकेल हे वास्तव आपण लक्षात घेतलं पाहिजे. त्यासाठी आपण आपल्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे. आपल्यातील नको असलेले दुर्गुण बाहेर काढून सद्गुणांची पेरणी केली पाहिजे. जगातील कोट्यावधी लोकांना सुख, शांतता, समाधान, आनंद धर्मच देतो .धर्म म्हणजे सदोदित सत्य, नीती, न्याय. धर्म माणसासाठी असतो माणसं धर्मासाठी नसतात हेही लक्षात घेतलं पाहिजे आणि मानवता धर्माला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. धर्म ही दुधारी तलवार असते त्यामुळे हितही साधले जाऊ शकते आणि हानीही होऊ शकते त्यामुळे त्याबाबतीत काळजी घेणे गरजेचे असते. वारकरी संतांनी धर्म सुधारणा चळवळ राबविली त्यालाच प्रबोधनाची किंवा परिवर्तनाची चळवळ असेही म्हटले जाते. त्यामुळे धर्माकडे पाहण्याची एक नवी दृष्टी समाजाला मिळाली असेही त्यांनी शेवटी सांगितले. याप्रसंगी प्रा डॉ एस ए बंड, डॉ राजेंद्र बंड, प्रा ढास सर, सुधाकर घोडके सर यांच्यासह गायक, वादक, टाळकरी, गावातील व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठया संख्येने उपस्थित होते.

# तरुणांनो हातात दगड घेऊन आयुष्याची राखरांगोळी करून घेऊ नका : कवठेकर

बीड : केंद्र व राज्य सरकार मधील काही मंत्री, आमदार, खासदार हे जाणीवपूर्वक जाती धर्मावर भाष्य करीत आहेत. प्रसार माध्यमांतून तसेच सोशल मीडियावर ते बेताल वक्तव्य करीत आहेत. आणि त्यांच्या बेताल वक्तव्याला बळी पडून आजचा तरुण रस्तावर उतरून दंगली मध्ये सहभागी होत आहे. या राजकीय पुढाऱ्यांनी जातीवाद आणि धर्मवाद या भवती तरूणांना गुरफटून ठेवले आहे. तरूणांना देखील जाती आणि धर्माचा पलीकडे काही दिसेनासे झाले आहे. हेच राजकीय पुढारी तरुणांचा हातात दगड देऊन दंगल घडवून आणत आहेत. परंतु स्वतः किंवा त्यांच्या घरातील कुठलाही सदस्य या दंगलीमध्ये सहभागी नसतो या दंगलीत सहभागी असतात ती गोरगरिबांची मुलं राजकीय नेते तरूणांची माथी भडकावून दंगली मधून आपली राजकीय पोळी भाजून घेतात त्यांचे ऐकून दंगलीत सहभागी होणारे तरूण मरेपर्यंत कोर्टाच्या चकरा मारतात. राज्य सरकारमधील काही जबाबदार मंत्री, आमदार, खासदार हे गेल्या काही दिवसापासून महापुरुषांच्या बाबतींत बेताल वक्तव्य करीत आहेत. यांच्या बेताल वक्तव्यामुळे सामाजिक सलोखा बिघडत चाललेला आहे. हे आजचा तरूणांच्या लक्षात येत नाही तरूणांनो वेळीच सावध होऊन या वाचाळ वीरांच्या नादी लागून दंगलीत सहभागी होऊ नका व आयुष्याची राखरांगोळी करून घेऊ नका उलट त्यांना सांगा या दंगली मध्ये तुझ्या घरातील आई, वडील, भाऊ, बहीण, बायको, मुलं, सासरा मेव्हणा यांना घेऊन पुढाकार घेतला पाहिजे कुठपर्यंत आमचे आयुष्य बरबाद करणार आहात असे ठणकावून सांगा. त्यांना सांगा कोणत्याही महापुरुषांनी व साधू संतांनी जाती धर्मात भेद करा म्हणून सांगितले नाही किंवा इतर धर्माचा द्वेष करा असे म्हटले नाही मंग तुम्ही का आम्हाला जाती धर्माचा नावावरुन दंगली करायला लावतात असे दंगली मध्ये सहभागी होणाऱ्या तरूणांनी या वाचाळ वीरांना विचारले पाहिजे.

# पाण्याचा काटकसरीने वापर करून उत्पादनात वाढ करण्याची बोरखेड येथे शेतकऱ्यांनी घेतली शपथ

## पाणी हेच आपले जीवन आहे - जलप्रेमी बाजीराव ढाकणे

बीड प्रतिनिधी. :- रविवार दिनांक १६ मार्च २०२५ रोजी जलजागृती सप्ताहानिमित्त मौजे बोरखेड ता जि बीड येथील यशोदिप शेतकरी बचत गटांच्या शेतकरी सदस्यांनी सहभागी होत आपल्या गावातील सर्व शेतकरी बांधवांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून शेतीच्या उत्पादनात वाढ करण्याची गरज आहे अशी संकल्पना करून सर्वांनी मिळून पाण्याचा काटकसरीने वापर करूया असा निर्णय घेत शपथ घेतली. यावेळी जलप्रेमी बाजीराव ढाकणे, बाळासाहेब गावडे यांच्यासह यशोदिप शेतकरी बचत गटांचे अध्यक्ष रामचंद्र शिंदे, सचिव विठ्ठल घरत , सदस्य विठ्ठल शिंदे, महादेव गावडे , आदम खॉ पठाण , बाबु बोराटे सुशिल बोराटे, गोरख अनपट, दत्ता सोनटक्के, खंडु सगळे इत्यादींची उपस्थिती होती.



राज्यात १६ मार्च ते २२ मार्च दरम्यान साजरा केला जातो ङ्क जलजागृती सप्ताह ङ्क या निमित्ताने आपणही पाणी जपून वापरले पाहिजे पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीसाठी पाणी आवश्यक आहे. मानव, प्राणी, वनस्पती आणि संपूर्ण पर्यावरणाच्या संतुलनासाठी पाण्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. जलप्रेमी बाजीराव ढाकणे

# अग्नीवीर सैन्य भरतीसाठी ऑनलाईन नोंदणी




बीड दि. २० :- अग्निवीर योजने अंतर्गत वर्ष २०२५-२६ साठी होणा-या अग्नीवीर भर्तीसाठी अविवाहित पुरुष आणि अविवाहित महिला उमेदवारांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठीची अधिसूचना www.joinindianarmy.nic.in या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख १२ मार्च ते १० एप्रिल राहील. सामान्य प्रवेश परीक्षा संभवता जून महिन्यात प्रसिद्ध करण्यात येईल. हे भर्ती अर्ज अहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील उमेदवार १२ मार्च ते १० एप्रिल पर्यंत भरू शकतात. तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या संधीचा फायदा घेऊन दि. १० एप्रिल पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

# पुणे येथील ब्युटी मेक स्पर्धेत तेजस्विनी मोरे यांना सुवर्णपद ट्रॉफी

किल्ले धारूर : पुणे येथील भोसरीत ब्युटी मेक स्पर्धेमध्ये धारूर येथील तेजस्विनी सचिन मोरे हिने भाग घेतला होता. या स्पर्धेत पुण्या सहित राज्यातील अनेक विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला होता. मात्र स्वतःच्या कला कौशल्यामुळे तेजस्विनी मोरे हिने एका महिलेचे अतिशय सुंदर पद्धतीने मेकअप केल्यामुळे तिला या स्पर्धेत सुवर्णपदक ट्रॉफी मिळाली आहे. तिचे या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे. धारूर येथील तेजस्विनी मोरे पुणे येथील भोसरी येथे ब्युटी मेकअप च्या क्लासला काम करत होती. तिने येथील कोर्स पूर्ण केला. फोर्स पूर्ण झाल्यानंतर ब्युटी कॉम्पिटिशन पार्लरच्या वतीने एक ओपन ब्युटी मेकिंग स्पर्धा ठेवण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यातील अनेक मुलींनी सहभाग नोंदवला. मात्र आपल्यातील कला कौशल्याच्या आधारावर तेजस्विनी सचिन मोरे या विद्यार्थिनीने इतर स्पर्धकांवर मात करून सुवर्ण ट्रॉफी मिळवली. तेजस्विनी च्या यशाबद्दल सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे. धारूर येथील जेष्ठ पत्रकार चंद्रकांत देशपांडे यांनी तिचा सत्कार करून गौरव केला.

# पीएम इंटर्नशिप योजनाच्या रोजगाराची संधी

बीडदि.20:-केंद्रशासनामार्फत देशात व राज्यात जास्तीत जास्त तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील या करिता भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (MCA) पीएम इंटर्नशिप योजना अंतर्गत 1,00,000 पेक्षा अधिक पदाकरिता संधी भारतात वेगवेगळ्या नामांकित कंपन्यांमध्ये आपणास देण्यात येत आहे. भारतातील सर्वोच्च कंपन्यांमध्ये सशुल्क इंटर्नशिपची संधी, तसेच शासनाचा मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात आला आहे. भारतातील केंद्र शासनाच्या करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी एक असलेल्या पीएम इंटर्नशिप योजना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत आहे. पीएम इंटर्नशिप योजनासाठी नोंदणी सुरु झाली आहे. या योजनेचा लाभ व अर्जाची माहिती खालीलप्रमाणे.
पात्रता- वय 21-24 वर्षे, पूर्णवेळ शिक्षण आणि नोकरीत नाही.
प्राधान्य पात्रता- इयत्ता 10, इयत्ता 12, ITI डिप्लोमा, पदवीधर
पात्रता नसणारे- उच्चशिक्षण संस्थांमधून पदवी प्राप्त केलेले (IT, IIM, NLU, IISER, NID, IIIT), CA, CMA, CS, MBBS, BDS, MBA, किंवा कोणतीही पदव्युत्तर/उच्च पदवी यांसारखी पात्रता, NAPS किंवा NATS अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केले, आधीच सरकारी कौशल्य, प्रशिक्षणार्थी, इंटर्नशिप किंवा प्रशिक्षण कार्यक्रमात, कुटुंबातील कोणताही सदस्य रु. 8 लाख (आर्थिक वर्ष 2023-24) पेक्षा जास्त कमावतो, कुटुंबातील कोणताही सदस्य हा कायम/नियमित सरकारी कर्मचारी असतो (कुटुंबात स्वतःचा, जोडीदाराचा आणि पालकांचा समावेश होतो)
पुढील सेक्टर्स मध्ये रोजगाराची संधी
इंधन , वायू आणि ऊर्जा, दूरसंचार, (FMCG) फास्ट-मूव्हिंग कन्झ्युमर गुड्स, बँका आणि वित्तीय सेवा, उत्पादन आणि औद्योगिक, सिमेंट आणि बांधकाम साहित्य, प्रवास आणि आदरातिथ्य, धातू आणि खाणकाम, किरकोळ आणि ग्राहक टिकाऊ वस्तू, रासायनिक उद्योग, फार्मास्युटिकल, पायाभूत सुविधा आणि बांधकाम, कृषी आणि संलग्न क्रियाकलाप, पुरवठा साखळी व्यवस्थापन, विमान वाहतूक आणि संरक्षण, आयटी आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, ऑटोमोटिव्ह, आरोग्यसेवा, टेक्सटाईल उत्पादन आदी.
रोजगाराची भूमिका खालील प्रमाणे
विक्री आणि विपणन, मानव संसाधन, ऑपरेशन्स व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान, व्यवसाय विकास, वित्त आणि लेखा, गुणवत्ता नियंत्रण आणि हमी, संशोधन आणि विकास/डिझाइन/उत्पादन विकास
तसेच भरतीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. https://pminternship.mca.gov.in/login/ या संकेत स्थळावर नोदणी करावी. तसेच सदर लिंक वर जाऊन नोंदणी करण्यासाठी व वारंवार अद्ययावत होणाऱ्या माहितीकरीता Beed Skill या https://www.facebook.com/beedskill/ या फेसबुक पेजला लाईक करावे व अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या 02442-299116 या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी केले आहे.


# धनंजय नागरगोजे यांच्या कुटुंबाला सुप्रिया सुळेंचा आधार; मुलांच्या शिक्षणाची घेतली जबाबदारी

केज : केज तालुक्यातील केळगाव येथे आश्रम शाळेत तब्बल अठरा वर्षे काम करूनही पगार मिळत नसल्याने आपल्या अवघ्या तीन वर्षीय लेकीला पत्र लिहून माफी मागत या शिक्षकाने आत्महत्या केल्याने उभा महाराष्ट्र हळहळला होता. दाखवत खासदार सुप्रिया सुळे यांनी या कुटूंबाला पूर्णपणे आधार द्यायचा निर्णय घेतला आहे. केळगाव येथील आश्रमशाळेत धनंजय नागरगोजे हे गेल्या अठरा वर्षांपासून कार्यरत होते. वारंवार पगार मागूनही त्यांना पगार दिला गेला नाहीच उलट ङ्गतू आत्महत्या करफ असा जीवघेणा सल्ला संस्था चालकांकडून दिला गेल्याचे स्वतः नागरगोजे यांनीच आपल्या लेकीला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. मुलांसाठी आणि आपल्या कुटुंबासाठी काही करू शकलो नाही, असे म्हणत अवघ्या तीन वर्षांच्या लेकराची माफी मागत त्यांनी आपले जीवन संपवले. या कुटूंबाची माहिती



मिळताच सुळे यांनी त्यांच्याशी संपर्क साधून आधार दिला. त्याच्याही पुढे जाऊन त्यांनी आता नागरगोजे यांच्या कुटूंबाला प्रत्यक्ष कृतीतून आधार द्यायचे ठरवले आहे. पगार नाही म्हणून आत्महत्या केलेल्या शिक्षकाच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी आता खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतली आहे. याबरोबरच त्यांना कायम रोजगार मिळावा यासाठीही त्या प्रयत्न करणार आहेत. .ज्या मुलीच्या नावे नागरगोजे यांनी पत्र लिहिले ती तीन वर्षांची त्यांची लेक आणि त्यांच्या पत्नीच्या उदरात वाढत असलेले दुसरे अपत्य या दोन्ही मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सुळे यांनी घेतली आहे. याशिवाय त्या मातेला आणि त्यांच्या दिराला नोकरी मिळावी यासाठी शासनदरबारी आपण पाठपुरावा करू, असे आश्वासनही त्यांनी दिले आहे. याबरोबरच विनाअनुदानित आश्रम शाळांना टप्पा अनुदान मिळूनही अद्याप शासनाकडून या शाळांना निधी मिळाला नाही, तो लवकरात लवकर मिळावा, यासाठीही पाठपुरावा करू असे सुळे यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षाचे पदवीधर सेल चे प्रदेशाध्यक्ष डॉ नरेंद्र काळे यांनी काल (दि. १९) केज तालुक्यात देवगाव येथे नागरगोजे कुटुंबियांची भेट घेऊन त्यांना याबाबत माहिती दिली. तसेच त्यांची विचारपूस करत खासदार सुप्रियाताई सुळे या कुटुंबाच्या पाठीशी समर्थपणे उभ्या असून कोणत्याही प्रकारची चिंता करू नये, असा शब्द दिला.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालय व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण मध्ये जागतिक ग्राहक दिन, संत तुकाराम बीज, शहाजीराजे जयंती संपन्न.



केज/ प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज. जि. बीड येथे विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम आणि उपक्रम संपन्न.दिनांक १५ मार्च २ ज२५ रोजी जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. ग्राहकांचे हक्क, अधिकार आणि कर्तव्य. या विषयावर परिसंवाद घेण्यात आला.दिनांक १६ मार्च २०२५ रोजी जगदगुरु संत तुकाराम महाराज बीजोत्सव साजरा करण्यात आला. संत तुकाराम महाराज एक अद्विितीय महापुरुष व तुकाराम गाथा चा विषयावर चर्चासत्रघेण्यात आले. दिनांक १८ मार्च २०२५ रोजी ङ्क स्वराज्य संकल्पक छत्रपती शहाजी राजे भोसलेङ्क यांची जयंती साजरी करण्यात आली.सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्रर्यालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक प्राचार्य डॉ. वसुदेव(बप्पा) गायकवाड हे होते.
विविध कार्यक्रमात प्रमुख पाहुणे व मागदर्शक म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, एस. के. वैरागे, अरुण गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, मुख्यमंत्रीदुत अमोल राऊत, हरिओम गायकवाड, संजय सोनवणे, मधुकर गायकवाड, आनंद (भैय्या) गायकवाड यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.
सर्व कार्यक्रम हे वेगवेगळया तारखेत झाले, सर्व कार्यक्रमांचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी केला तर सर्व कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे व संस्थेचे आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २१ मार्च २०२५
https://lokaarambh.com


# श्री क्षेत्र भगवानगडाच्या दिंडीचे पैठणकडे प्रस्थान

भगवानगड-प्रतिनिधी शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्र ातून अनेक साधुसंतांच्या दिंड्या पैठणला जातात. श्री क्षेत्र भगवानगड संस्थानची सुद्धा दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी नाथांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दिंडी पैठणला जाणार आहे. या सोहळ्याला मनाथषष्ठीफ असे म्हणतात. या सोहळ्यासाठी भगवानगडाच्या भक्तमंडळींनी गडावर येऊन सोमवार दि.१७ मार्च रोजी दुपारी ठीक १ वाजता ह.भ.प.श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या अध्यक्षतेखाली दिंडी सोबत पैठणकड े प्रस्थान केले. या दिंडी सोहळ्याचा पहिला मुक्काम राणेगावमध्ये, दुसरा मुक्काम प्रभूवाडगावमध्ये असून तिसऱ्या मुक्कामी दिंडी पैठणमध्ये पोहोचते. दिंडी सोहळ्या दरम्यान भगवानगडावरील युवा कीर्तनकार, सर्व साधकवर्ग व गडाचा संपूर्ण भक्तवर्ग मोठ्या आनंदामध्ये ङ्गभानुदास एकनाथफ नामाचा गजर करत मार्गक्रमण करत आहे. वारीमध्ये चालताना पहाटे काकडा भजन, आंधळा, पांगळा, वासुदेव, गौळणी इत्यादी होतात. त्यानंतर दुपारचे अभंग गायले जातात. यामध्ये समाधीचे अभंग, पत्रिकेचे अभंग इत्यादींचा समावेश असतो. सायंकाळी ४ वाजता श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठ व शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांचा हरिपाठ होतो. हरिपाठानंतर सर्व वारकर्यांना नियोजित ग्रामस्थांतर्फे जेवणाची पंगत दिली जाते. रात्री ८ ते १० या वेळेमध्ये कीर्तनाचा कार्यक्रम असतो. कीर्तनानंतर जागर केला जातो. दिंडी पैठणमध्ये पोहोचल्यानंतर नाथवंशज दरवर्षी भगवानगडाच्या फडामध्ये येऊन भगवानगडाच्या दिंडीला नाथषष्ठी सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण देतात. श्री क्षेत्र भगवानगडाच्या फडामध्ये नाथांच्या समाधी सोहळ्याचा काला होईपर्यंत दररोज पहाटे काकडा भजन, दुपारचे भजन, दोन्ही हरिपाठ, हरिकीर्तन, हरीजागर इत्यादी सर्व धार्मिक नित्यनियम पार पाडले जातात

# बीडमध्ये आणखी एक हत्याकांड, दोन भावांची निर्घृण हत्या; ६ जणांवर मकोका

बीडमध्ये गेल्या काही दिवसांपासून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला तीन महिने उलटले आहेत. या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींवर मकोका लावण्यात आला आहे. तसेच बीडमधील खंडणी प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आला आहे. आता बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडच्या टोळीवर मकोका लावल्यानंतर आता आणखी एका सहा जणांच्या गुन्हेगारी



टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या टोळीत तीन महिलांचाही समावेश आहे.दीपक ऊर्फ सलीम नारायण भोसले, सोमीनाथ ऊर्फ नाज्या दिलीप काळे, मुद्दसर मन्सुर पठाण, सोनी ऊर्फ अनिता गोरख भोसले, शशिकला दीपक भोसले आणि संध्या कोहीनुर भोसले, अशी मकोका लावण्यात आलेल्या आरोपींचे नावे आहेत. या सर्वांचा टोळीत समावेश आहे. या टोळीने बीड, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यात विविध गंभीर गुन्हे केले आहेत.सहा आरोपींना अटक

मिळालेल्या माहितीनुसार, १६ जानेवारी रोजी वाहिरा ते पिंपळगाव रोडवरील गायरान जमिनीत या आरोपींनी आजिनाथ विलास भोसले आणि भरत विलास भोसले या दोघांची निर्घृण हत्या केली होती. या प्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आता याप्रकरणी सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर अजून तीन जण फरार आहेत.गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यास मदत होणार या टोळीवर खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, अवैध शस्त्र बाळगणे, पुरावे नष्ट करणे, रस्ता अडवणे अशा स्वरूपाचे १३ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे या टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी घेतला. सहाय्यक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे यांनी प्रस्ताव तयार करून वरिष्ठ अधिका-यांकडे पाठवला. विशेष पोलिस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी या प्रस्तावास मंजुरी दिली. या

कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यास मदत होणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पोलिसांनी धाडसानी धाड टाकून मिलन डे मटका चालवणाऱ्यांवर केले गुन्हे

माजलगाव। प्रतिनिधी माजलगाव शहरातील मटका बंद व्हावा म्हणून माजलगाव तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने प्रयत्न करण्यात आले होते जवळपास सर्वच वर्तमानपत्रात बातम्या छापून आल्या होत्या याचीच दखल घेत माजलगाव पोलिसांनी आज धडाकेबाज कारवाई करत मिलन डे च्या मटका घेणाऱ्या तिघांवर कार्यवाही केली त्याबाबत माजलगाव पोलिसात गुन्हाही दाखल झाला माजलगाव पोलिसाच्या या जनहितार्थ कारवाईमुळे माजलगाव शहरवाशीयांकडून पोलिसांचे अभिनंदन करण्यात येत असून सर्वसामान्य महिला वर्गाकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे . माजलगाव




शहरातील शहरातील मटका बंद करावा म्हणून माजलगाव येथील पत्रकारांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे मागणी केली होती तशा आशयाच्या बातम्या अनेक वर्तमानपत्रातून प्रकाशित झाल्या आणि माजलगाव पोलीस प्रशासन खडबडून जागत झालं दिनांक १८/ ०३/२०२५ रोजी शहरातील मिलन डे नावाचा मटका घेणाऱ्या तीन मटका जुगार मालक यांच्यावर धडाकेबाज कारवाई केली या कारवाईमध्ये बुक्की मालक सलीम शेख, असेफ शेख, आणि इरशाद शेख या तिघांवर कार्यवाही करून नवीन कायद्या नुसार माजलगाव पोलीस ठाणे शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे त्यांच्याकडून ४०२२० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून माजलगाव पोलिसांनी सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, चेतना तिडके, नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शना नुसार माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, के बी माकने, माधव तोटेवाड यांनी केली आहे माजलगाव पोलिसांचे या धडाकेबाज कार्यवाहीमुळे सर्वत्र अभिनंदन होत आहे आणि गोरगरीब मजूर कुटूंब व महिलांच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात येत आहे मात्र माजलगाव पोलिसांची कार्यवाही एवढ्यावरच न थांबता नियमितपणे चालू राहिली तर निश्चितच आमचे संसार नावारूपाला येतील बोलत आहेत.

# पिंपळनेर भागात रणरणत्या उन्हात कांदा काढणी सुरु

पिंपळनेर-प्रतिनिधी बीड तालुक्यातील पिंपळनेर भागामध्ये रब्बी हंगामातील उन्हाळी कांदा काढणी सुरू झाली आहे. सध्या तापमानाचा पारा ३५ अंशांवर गेल्याने अंगाची लाही लाही होत असतानाही शेतकरी कांदा काढणीच्या कामात व्यस्त आहेत. या तीव्र उष्णतेचा परिणाम आरोग्यावर होण्याची शक्यता असल्याने शेतमजूर, शेतकऱ्यांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. पिंपळनेर, जवळा, बेलवाडी, बाबुळवाडी आडगाव, नाळवंडी, वडगाव गु ंदा, ईट, रंजेगाव, केसापुरी परभणी, आंबेसावळी या परिसरात मोठ्या प्रमाणात उन्हाळी कांद्याची लागवड केली जाते. सध्या कांदा काढणीस सुरुवात झाली असून मार्च महिन्यातच कांदा काढणीची लगबग वाढली आहे. दरवर्षीपेक्षा या वेळी फेब्र ुवारीला तापमानाचा पारा वाढून मार्चमध्ये तापमानाचा पारा ३६ अंशांवर गेल्याने प्रचंड उष्णता जाणवत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी, शेतमजूर कडक उन्हाच्या झळा अंगावर झेलत अंगाची लाही लाही होत असताना शेतामध्ये कांदा काढणीचे काम करताना दिसत आहे. सध्या कांद्याचे दर घसरल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. सध्याच्या वाढत्या तापमानात कांदा काढणी करताना मजुरांच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. मोठ्या कष्टाने पिकविलेल्या कांदा पिकाला बाजारभाव मिळेल या आशेवर शेतकरी असताना दरात घसरण झाल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. आज उद्या कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवून शासन कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसेल या एका आशेवर रणरणत्या उन्हात शेतकरी कांदा काढणी करताना पहायला मिळत

# बोरखेडच्या बिनविरोध सरपंच अपात्र

बीड-प्रतिनिधी १९८४ साली केलेल्या अतिक्रमणामुळे बोरखेडचे बिनविरोध सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांना जिल्हाधिकारी बीड यांनी अपात्र केले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की बोरखेड सरपंचा विरोधात माजी सरपंच शहादेव हिंदोळे यांनी ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १४ ज ३ व १६ अन्वये तक्रार दाखल केली होती. बोरखेडचे सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांनी गट नंबर १९७ मध्ये सन १९८४ साली अतिक्रमण केले असून तेव्हापासून सदरील जमीन वहीती करत आहे तसेच १९९२ ९३ मध्ये अतिक्रमण प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे देखील एडवोकेट के एस पंडित यांनी निदर्शनास आणून दिले.पंडित साहेबांना ॲड सुनिल वडमारे,ॲड.नागेश तांबारे, ॲड. अक्षय मुळे, ॲड.अभिजीत कदम यांनी सहकार्य केले. अतिक्रमण प्रकरणात बोरखेड सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांना अपात्र करण्याचे आदेश माजी जिल्हाधिकारी बीड यांनी दिले आहेत.

# खळबळजनक, पुण्यातील चार लोकांच्या मृत्यूच्या घटनेस यू टर्न मालकाने पगार कापल्याच्या रागातून बस चालकनेच बस पेटवली

पुणे शहरात बुधवारी खळबळजनक दुर्घटना झाली होती. व्योम ग्राफिक्स या आयटी कंपनीतील कर्मचाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या मिनी बसला (टेम्पो) आग लागली होती. या आगीत चार कर्मचाऱ्यांचा होरपळून मृत्यू झाला. सहा जण जखमी झाले. पुढील बाजूस बसलेले कर्मचारी आणि चालक पेटत्या बसमधून बाहेर पडले. आता मिनी बसला लागलेली ही आग घातपात असल्याचे समोर आले आहे. पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत या घटनेची माहिती दिली. बसचालकानेच पगार कापल्याच्या रागातून हे कृत्य केल्याचे त्यांनी सांगितले.पिंपरी-चिंचवडच्या हिंजवडी येथील व्योम ग्राफिक्स या आयटी कंपनीचे १२ कर्मचारी बसमधून जात होते. त्या मिनी बसला आग लागली. त्यात सुभाष भोसले, (वय ४२), शंकर शिंदे ( वय ६०), गुरुदास लोकरे ( वय ४०) आणि राजू चव्हाण (वय ४०) या चौघांचा मृत्यू झाला होता. हा प्रकार अपघात वाटत होता.



परंतु हा अपघात नाही तर घातपात असल्याचे समोर आले आहे. यासंदर्भातील सीसीटीव्हीसुद्धा सम ोर आले आहे. बस चालक जनार्दन हंबर्डीकर यानेच हा प्रकार केला आहे. पोलीस उपायुक्तांनी दिली माहितीपोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी या घटनेची माहिती देताना सांगितले की, व्योम ग्राफिक्स कंपनीतील कामगारांचा असलेला वाद आणि दिवाळीम ध्ये मालकाने पगार कापल्याच्या रागातून बस चालक जनार्दन हंबर्डीकर याने बस पेटवून दिली. चालक जनार्दन हंबर्डीकर याने कट रचून हा गुन्हा केल्याचे पोलीस तपासामध्ये उघडकीस आले आहे.

# आदित्य ठाकरेंना अटक करून चौकशी करा - दिशा सालियान केसवरून नितेश राणे आक्रमक

दिशा सालियनच्या वडिलांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली आहे. सामूहिक बलात्कार करुन दिशाची हत्या केल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी याचिकेतून केला. यामुळे हे प्रकरण आता पुन्हा चर्चेत आलं असून ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावरही या याचिकेत आरोप करण्यात आले होते. पेडणेकरांनी दिशाभूल केल्याचाही आरोपही याचिकेत आहे. आता याच मुद्यावरून भाजचे नेते, मंत्री नितेश राणे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ही फार सरळ, सोपी केस आहे. ती जर (दिशाची) आत्महत्येची केस होती तर ८ जूनपासून ते आत्तापर्यंत पळापळी का चालली आहे, लपवालपवी का चालली आहे ? आदित्या ठाकरेंना यातून वाचवावं का लागतंय ? असा सवाल नितेश राणेंनी उपस्थित केला आहे. त्यांची जर काहीच इन्व्हॉल्व्हमेंट नसेल तर त्यांची मग एवढी पळापळ का सुरू आहे ? असे ते म्हणाले. सुप्रीम कोर्टाचं एक जजमेंट आलं होतं की, त्यानुसार, कोणावरही बलात्काराचा चार्ज असेल तर सर्वात पहिले त्याच्याविरोधात केस रजिस्टर करावी लागते. त्या नियम ानुसार, केस दाखल करून आदित्य ठाकरेंना अटक करावी, त्यांची चौकशी करावी, ज्याचं ज्याचं नाव याप्रकरणात असेल,जो न्याय अन्य लोकांना लागतो, तोच न्याय आदित्य ठाकरेंना लावावा अशी आक्रमक भूमिका घेत नितेश राणेंनी अटकेची मागणी केली आहे. आमची थोबाडं बंद होतील आदित्य ठाकरे असतील, सूरज पंचोली असेल किंवा दिनो मोरिया असेल त्यांची चौकशी करावी, त्यांचा या केसमध्ये काहीच हात नसेल तर चौकशीमध्ये दूध



का दूध पानी का पानी का पानी होईल, आम्हा सर्वांची थोबाडं बंद होऊन जातील, असे राणे म्हणाले. ही आत्महत्याच होती, या केसमध्ये काहीच नाहीये माझा हात, मला गोवण्यात येत आहे, असा विश्वास जर आदित्य ठाकरेंना असेल तर फार सरळ सोप आहे. त्यांनी चौकशीला सामोरं जावं, खरं काय ते सांगावं, पुरावे द्यावेत आणि आम्हाला सर्वांना खोटं ठरवावं असं आव्हानही नितेश राणेंनी दिलं. हे प्रकरण आत्ताच का तापलं, ते तापवलं गेलं आहे का ? असा सवाल विचारत मुलीची हत्या झाली असेल तर कोणतेही आई-वडील ५ वर्ष गप्प बसणार नाहीत असा मुद्दा शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना उपस्थित केला होता. त्यावरही नितेश राणेंनी थेट उत्तर दिलं. त्या ५ वर्षांमध्ये यांच्याच, महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्र्यांच्या ( उद्धव ठाकरे) मुलाचं (आदित्य ठाकरे) नाव केसमध्ये आलं होतं. त्यांनी किती मोठं प्रेशर टाकलं होतं, हे तुम्ही दिशा सालियानच्या वडिलांकडून ऐकावं. काहीही न बोलण्यासाठी, आमच्यावर फार मोठा दबाव होता, असं त्यांनी स्वत: सांगितलं होतं, असा दावा राणे यांनी केला. किशोरी पेडणेकर त्यांच्या घरी का गेल्या होत्या मग ? असा सवालही त्यांनी केला. याप्रकरणात आता सर्व राजकारण्यांनी बाजूला व्हायला पाहिजे, एका मुलीवर सामूहिक बलात्कार झाला, तिची हत्या झाली. आता तिला न्याय मिळाला पाहिजे, आमचं एवढंच म्हणणं आहे, एवढीच भूमिका असल्याचं राणेंनी नमूद केलं. राऊतांचं वय वाढलं पण बुद्धी नाही, राणेंचा खोचक टोला औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा सरकारव र उलटला आहे, त्यावरून दुसरीकडे लक्ष वेधण्यासाठी दिशा सालियनचा मुद्दा पुन्हा समोर आणला आहे, असा आरोपही संजय राऊतांनी केला होता. त्यावर नितेश राणेंनी खोचक टोला हाणला. माणसाचं वय वाढतं, पण कदाचित बुद्धी वाढत नाही, याचं उत्तम उदाहरण म्हणजे संजय राऊत आहेत. औरंगजेबाचा विषय , नागपूरला झलेला हिंसाचार आणि दिशा सालियान यांच्या वडिलांची भूमिका याच्याकत काय संबंध असू शकतो ? असा सवाल राणेंनी विचारला. दिशा सालियानच्या वडिलांचं राजकारणाशी काही घेणंदेणं नाही, त्यांनी एक भूमिका मांडली, ते कोर्टात गेले. अनेक लोकं या केसचा फॉलोअप घेत आहेत. कोर्टात तारखा पडत आहेत. आणि आता दिशा सालियानच्या वडिलांचा विश्वास बसला आहे की माझ्या मुलीने आत्महत्या केलेली नाही, त्याच्यात काहीतरी गडब आहे, तिची हत्या झाली असं त्यांना वाटतंय. याप्रकरणाची चौकशी झाली पाहिजे अशी त्यांची भूमिका असल्याचं राणे म्हणाले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com